पिंपरी चिंचवड महानगरपालिका
माहिती व तंत्रज्ञान विभाग
क्रमांक-मातंवि/13/कावि/176/16
दिनांक- 08 /07/ 2016

परिपत्रक,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत नागरिकांना महानगरपालिकेच्या संबंधित विविध सेवा सुविधा ऑनलाईन पध्दतीने उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत. त्यामध्ये मिळकतकर, पाणीपट्टी, जन्म-मृत्यू दाखला, तक्रार निवारण, नागरी सुविधा केंद्र , सारथी हेल्पलाईन, क्रिडा खेळ आरक्षण, भाग नकाशा, झोन दाखला, विवाह नोंदणी आरक्षण, स्थानिक संस्था कर, ऑनलाईन बांधकाम परवानगी व माहितीचा अधिकार इत्यादी सेवांचा समावेश आहे.

सद्यस्थितीत मोबाईलचा वाढता वापर विचारात घेता महानगरपालिकेमार्फत नागरिंकाच्या सोईकरीता विविध सेवा मोबाईलद्वारे उपलब्ध होण्याकरीता मोबाईल अप्लिकेशन विकसित करणेचे कामकाज कार्यान्वित आहे.

सद्यस्थितीत पावसाळयाचे दिवस असल्याने रस्त्यावर खड्डे पडल्यास खड्यांची माहिती तात्काळ महानगरपालिकेस कळविणे शक्य व्हावे व त्यांची तातडीने दुरूस्ती व्हावी याकरीता महापालिकेमार्फत नागरीकांसाठी Mobile App “Pothole Mobile based Management System” कार्यान्वित करणेत आलेली आहे. पहिल्या टप्प्यात सदरची सुविधा ही प्रायोगिक तत्वावर Android based Mobile द्वारे उपलब्ध करणेत आलेली आहे.

सदरचे Mobile App Google Play Store वरून Download करणेची सुविधा उपलब्ध असून सदरची सुविधा M-PCMC या नावाने उपलब्ध आहे. या App चा वापर करणेसाठी नागरिकांना प्रथमत: आपले नांव, मोबाईल क्रमांक व ई-मेल आय डी इत्यादी माहिती भरून Onetime रजिस्ट्रेशन करणे आवश्यक आहे.

सदर सुविधेद्वारे नागरिकांना रस्त्यावर पडलेल्या खड्याचा फोटो अपलोड करणेची सुविधा उपलब्ध असून सदरची माहिती तत्काळ महानगरपालिकेस Geo location सह उपलब्ध होणार असल्याने रस्त्यावर पडलेल्या खड्यांबाबत प्राप्त तक्रारींवर स्थापत्य विभागास तातडीने कार्यवाही करणे शक्य होणार आहे. तसेच नागरिकांस App द्वारे केलेल्या तक्रारीचे निराकरण झाले आहे किंवा नाही, याबाबतची खात्री करता येणार आहे. त्याबाबतचे SMS सदर App द्वारे उपलब्ध होणार आहेत. तरी या सुविधेचा शहरातील सर्व नागरिकांनी लाभ घेऊन महापालिकेस सहकार्य करावे असे अवाहन महानगरपालिकेच्या वतीने मा. आयुक्त यांनी केलेले आहे.

M-PCMC App द्वारे नागरिकांकडून प्राप्त होणा-या तक्रारी या ‘तक्रार निवारण संगणक प्रणाली’ मधुनच येणार असुन नागरीकांना त्यांच्या तक्रारींचे सध्यस्थिती अहवाल मोबाईलवर SMS द्वारे मिळणार असल्याने सदर संगणक प्रणालीद्वारे आलेल्या तक्रारींचे निवारण तातडीने करणेची दक्षता घेण्यात यावी.

आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - 411018

प्रति,
सर्व संबंधित विभाग.